PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 4, ISSUE 3

ख्रिस्ती पंथाला नाही;
ख्रिस्ताला प्रकट करणारा खरा मिशनरी असतो

वळवी विश्वास गोरखनाथ
संशोधक विध्यार्थी सामाजिक शास्त्रे प्रशाळा,
इतिहास विभाग,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
महाराष्ट्र भारत

"जेव्हा आपले अमर लेखन चांगल्या प्रतीत उमटलेले पाहतो.तेव्हा आपण आपल्या जीवनाचे टीप कागदाने टिपलेले हस्तलिखित अधिक मनःपूर्वक अग्नीच्या स्वाधीन करित असतो."

प्रस्तावना:-

पवित्रशास्त्राच्या प्रवासात आपण काय अपेक्षा करणार"बायबल हे निरनिराळ्या सहासष्ट पुस्तकांचा ग्रंथसंग्रह आहे.ती पुस्तके चाळीस निरनिराळ्या मानवी लेखकांद्वारे सोळाशे वर्षाच्या कालावधीत लिहिली गेली आहेत.हे लेखक निरनिराळ्या जीवन क्षेत्रातुन आणि समाजातील विविध स्तरातून आलेले असून त्याच्यामध्ये राजे आणि राजपुत्र,विद्वान आणि कवी तसेच कोळी आणि शेतकरी,वैद्य आणि तत्वज्ञानी यांचा समावेश होतो.त्यांची पाश्र्वभूमी,संस्कृती, आणि अनुभव व्यापक असून त्यांच्या पात्रतेत आणि अनुभवात विविधता आहे.त्यांनी भिन्न परिस्थितीत लिखाण केले.राजवाड्यात आणि तुरुंगात,गजबजलेल्या शहरात,निर्मनुष्य बेटावर आणि वैराण वाळवंटात,काहींनी प्रसिद्धीत,काहींनी पाडावपणात तर काहींनी शत्रूपासून पलायन करीत असतांना.त्यांच्या लेखनात इतिहास,चरित्र,काव्य,तत्वज्ञान,नीतिशास्त्र भविष्य यांचा अंतर्भाव आहे पवित्रशास्त्र एका ख्रिस्ती व्यक्तीच्या जीवनात ख्रिस्ताचे प्रवासवर्णने लिहीणारा पवित्र शब्द

आहे.पवित्रशास्त्राच्या प्रवास देवाच्या कृपेशिवाय शक्यच नाही.काय आपण एक ख्रिस्ती व्यक्ती म्हणून या प्रवासात प्रवास करीत आहात.

ख्रिस्तात तुम्ही बदललात;हे काय चमत्कारापेक्षा कमी आहे.नोहाच्या तारवात जे प्राणी गेले होते ते जसे आत गेले होते तसेच बाहेर आले. त्याच्यात काही बदल झाला नाही.पण जे कोणी येशू ख्रिस्त ह्या उद्धाररुपी तरवात प्रवेश पावले ते बदलून बाहेर आले त्यांचा पोशाख आणि त्यांचे रूप सर्वकाही बदलून गेले ते जुन्या स्थितीत राहू शकत नाहीत."(थॉमसन.बी.थॉमस) चमत्कार काय आहे.खचितच नवीन जन्म झाल्यावर जीवनात झालेले रूपांतर म्हणजेच आपल्या स्वतःच्या डोळ्यापुढे झालेला हा सर्वात मोठा चमत्कारच आहे.बिली ग्रॅहम म्हणतात "जर संपत्ती गमावली तर काहीच गमावले नाही,जर आरोग्य गमावले तर काहीतरी गमावले असे होते,पण जर चारित्र्य गमावले तर सर्व काही गमावल्यासारखे आहे.तुम्हचे नवे व्यक्तिमत्व आणि चारित्र्य हे देवाकडून मिळालेले दोन दागिने आहे. हे काय चमत्कारापेक्षा कमी आहे.विश्वासाने आणि प्रभूच्या कृपेने तुमचे तारण झाले.हे काय चमत्कारापेक्षा कमी आहे.देवाच्या प्रत्यक्ष शब्द पवित्रशास्त्राच्या माध्यमातून तुम्ही वाचता.हे काय चमत्कारापेक्षा कमी आहे आज तुम्ही जगापासून आणि अनंतमृत्यू पासून अलग होऊन देवाच्या राज्यात सुरक्षित आहात.हे काय चमत्कारापेक्षा कमी आहे.आज सैतान,सौतानाचे दूत, मृत्यू,भय,रोग,एका ख्रिस्ती व्यक्तीचे काहीच करू शकत नाही. हे काय चमत्कारापेक्षा कमी आहे.* *ख्रिस्ताचा अजिंक्य अविनाशी अंश,विजय,शब्द,बीज यात तुम्ही बदलतात.हे काय चमत्कारापेक्षा कमी आहे.चमत्काराच्या गोष्टी करणाऱ्या आणि साक्षी देणाऱ्यांनी वरील घटकांचीही चमत्काराचा नावावर साक्षी द्यावी ही नम्र विनंती.

ख्रिस्ती पंथाला नाही;ख्रिस्ताला प्रकट करणारा खरा मिशनरी असतो:-

"मोशे देवाला भेटून सिनाय डोंगरावरून उतरला तेव्हा त्याचे मुख सुर्यासारखे झळकत होते.आणि त्याने देवाचे शब्द लोकांच्या कानी पाडले... आज चर्च मधून बाहेर निघाल्यावर मोशेप्रमाणे तुम्ही वावरतात का?आणि पाळकाद्वारे ऐकलेला पवित्र शब्द लोकांचा कानी पाडता का?अन्यथा_ *अनिल दहिवाडकर* म्हणतात त्याप्रमाणे_पुढचा सर्व वेळ (बाकीचे सहा दिवस) मटणवार म्हणून पाळण्यात जातो.

"स्वतःस ल्युथरन नव्हे,ख्रिस्ती म्हणा".'ल्युथरन चर्च हे नाव धारण करणाऱ्या ख्रिस्ती मंडळीला खुद्द मार्टिन ल्युथरचाच विसर पडला होता.ल्युथरचे शिक्षण आता कोणाच्या आठवणीतही उरले नव्हते नुसत्या ल्युथरन या नावातच काह जादु आहे,असे ल्युथरच्या अनुयायांस वाटू लागले होते या संदर्भात खुद्द मार्टिन ल्युथरने स्वतः विषयी लिहून ठेवले होते...ल्युथरने लिहिले होते..."आधी मी सांगतो की,माझे नाव बाजूस सारून स्वतःस ल्युथरचे नव्हे तर ख्रिस्ती म्हणा.ल्युथर कोण आहे?जे शिक्षण मी देतो ते माझे नाही.आणि मी कोणासाठी क्रुसावर मेलो नाही.मी पौलाच,मी पेत्राचा,असे कोणी कोणी म्हणत,ते पौलाला आवडत नसे.ज्यांना ख्रिस्ताच्या नावात बोलावले गेले त्यांना माझ्या नावाने ओळखावे असा मी कोण आहे?माती ज्याची वाट पाहत आहे असा मी एक सामान्य माणूस नाही का?माझ्या बंधुनो,असे करू नका.पंथभेद सांगणारी ही नावे मोडीत काढा आणि आपण ख्रिस्ताचे अनुयायी आहोत,तेव्हा,ख्रिस्ती अशीच आपली ओळख सांगा,मी प्रभू नाही आणि कोणत्याही मनुष्य प्राण्यावर प्रभु होण्याची माझी इच्छा

नाही"(**सुवार्तिकांच्या पाऊलखुणा:-स.ना.सूर्यवंशी**)आज भरपूर मंडळ्या पंथभेदामुळे ख्रिस्तापासून वेगळ्या झालेल्या आहे.आणि खोट्या शिक्षणाने आणि लोकांच्या अधिनतेत ग्रासलेल्या आहेत, *पंथभेद म्हणजे विचारांचे भेदच नाही,तर आपल्या खोट्या शिक्षणाचा परंपरा आणि नियम कट्टरतेने पाळून त्यासाठी समोरच्या विचारांचे आणि तत्वाचे उलट्या दिशेने स्तरीकरण करणे होय."पण का? ख्रिस्ती मिशनरी चळवळीचा इतिहास असा असंख्य ख्रिस्ती पंथानी भरलेला आहे,पण मी सांगतो त्या सर्वांनी ख्रिस्ताला प्रकट करून एक ख्रिस्ती व्यक्ती म्हणून स्वतःला ख्रिस्तात नम्र केले.ख्रिस्ती मिशनऱ्यांनी पंथ,नियम,विचार,परिवार,आणि स्पॉन्सरशिपचा विचार केला असता,तर विलियम कैरी,बर्थलोमस जिगंनबालग,गॉर्डन हॉल,असे असंख्य ख्रिस्ती मिशनरी भारतातून पळून गेले असते.पण ते मागे वळून पाहणारे नव्हते कारण त्यांनी एका पंथाला नाही तर सर्वोच ख्रिस्ताला प्रकट केले.*

"परमेश्वर उद्धार देते हे धर्ममंडन नही" (विलियम टिंडले)_*

परमेश्वर का राज्य देव धर्ममंडन और कलिसीया के द्वारा चलाते हे, *लेकिन लुसिफर की तरह:आज कहीं कलिसिया और धर्ममंडन अपने गर्व के गुंबारेमे मे फुगकर स्वर्गकि राज्य की आधारशीला को खत्म करना चाहते हे.यथार्थ मे हमे तब दुःख होता हे जब कलिसिया मसीही की उद्धार की बात न करके अपने धर्ममंडन की बातोकी और कार्योका बखेडा बया करती हे!**जे.एन.डी.एन्डरसन** सही लिखते हे"बहुतसे धर्ममंडन मासिहियत के निर्विवाद आकलनोपर आधारित हे.शास्त्र और आत्मा की कसोटी पार न किई हुई बहुतशी कलिसीया अपने परमेश्वर के सही सिद्धांतोका परित्याग करके,अपने झुठे सिद्धांतो से भरीहुई हे!और अपने शारिरीक गर्गकि आंतरजाल मे फसकर आत्मिक पिंड के अस्तित्व को समाप्त कर दे रही हे. ऐसें धर्ममंडन और कलिसिया को **क्लार्क पिनोक** आव्हान करते हे. *"धर्ममंडन का लक्ष्य किसीं व्यक्ती को एक मसीही बनने के लिए धोखे से या उसकी इच्छा के बिना निरुत्तर करना नही हे.बौद्धिक रितीसे से मनुष्यके समक्ष मसीही सुसमाचार के लिए प्रमाण को प्रस्तुत करना ताकी वे पवित्र आत्मा की विश्वासोत्पादक सामर्थ से एक अर्थपूर्ण समर्पण अस्वीकृत करती हे.उससे हृदय मग्न नही हो सकता हे.आप मसीही क्यू हे?एक विश्वासी का यह उत्तरदायित्व हे की इस प्रश्न का उत्तर दे.क्या आप एक मसीही हे?और आपने धर्ममंडन और कालिसिया से इसका जवाब मांगा हे? **पॉल लिटिल स्टोट** उद्दरत करते हे *"हम एक मनुष्य के बौद्धिक अहंकार मे सहायक नही हो सकते हे,परंतु हमे उसकी बौद्धिक सत्यनिष्ठा मे सहायक होना चाहीए"_एक मसीही होकर आप किस बात से सहमत हे!धर्ममंडन के बौद्धिक बखानोसें?या शास्त्र और आत्मा से.

कुमारी जॉन ऑफ आर्क आणि चर्चने दिलेली मृत्यूदंडाची शिक्षा:-

आरोप :- _चर्चचा मदतीवाचून ती स्वर्गातील शक्तीशी बोलली हा तिच्यावरील मुख्य आरोप....दुसऱ्या शब्दात हेच सांगायचे झाल्यास भटाभिक्षुकांच्या इच्छेला मान देण्याऐवजी तिने देवाची इच्छा मानली."

खटला चालविणारे चर्च:-_मुख्य न्यायाधीश बोव्हेसचा पैरी कौचोन हा होता 'तो अत्यंत श्रद्धाळू व निष्ठावंत ख्रिश्चन होता.पैरीसच्या विध्यापिठात त्याच्या धार्मिकतेची जाहीर स्तुती केली होती.बिशप

देवासाठी किती तळमळतात किती त्यांचा संयम,केवढी त्यांची धडपड .अशा प्रकारे विद्यापीठाने बिशपची पाठ थोपवली.आणि न्याय झाला._

चर्चची शिक्षा:-प्रोपेसर निकोलस मिडी याने तिला प्रवचन दिले तो म्हणाला *"चर्चचा एखादा अवयव बिघडला तरी सारे चर्च रोगी होते" नंतर "तू मरायला लायक आहेस" असे तिला सांगून तो म्हणाला "चर्चच्या बऱ्यासाठी तू मर.जा,शांतीने मर.चर्च तुला वाचवू शकणार नाही"* आपल्या गुन्हगारांचा कत्तलीच्या दोष आपणाकडे येऊ नये म्हणून चर्चवाले शेवटी नेहेमी म्हणत "चर्च काय करणार?चुरच्या हातात काय आहे?पण जॉन ऑफ आर्कला अधिक समजत होते.

स्टेटकडून मृत्यूची अंमलबजावणी:-तिला मरणाची शिक्षा देऊन चर्चच्या प्रतिनिधींनी तिला स्टेटच्या मारेकऱ्यांच्या हवाली केले. *रक्तपाताकडे आपणास पाहवत नाही असे चर्चचे म्हणणे असे.चर्च मरणाची शिक्षा देई पण स्वतः तिची अंमलबजावणी करीत नसे.ते काम स्टेटकडे असे.* चर्च शिक्षा देऊन पुन्हा त्या मरणोन्मुखांना मारले जात असता त्यांच्या आत्म्यासाठी प्रार्थना करी.

पोपची माफी:-

शेवटी साडेचारशे वर्षांनी पोपने असे जाहीर केले *"जे संदेशात जॉनला भेटत ते सैतानाचे दूत नसून देवदूतच होते. मी तिची शिक्षा रद्द करतो व ती संत होती असे जाहीर करतो.मध्ययुगात अनात्मवादी ख्रिस्ती लोकांचा भरणा चर्चमध्ये वाढलेला असल्याकारणाने आणि चर्चच्या आंतरिक दबावामुळे तसेच चर्चच्या खोट्या नियमामुडे खऱ्या ख्रिस्ती लोकांना मध्ययुगात मोठ्या प्रमाणात आपले बळी द्यावे लागले.(**उदा:- ब्रुनो, गॅलिलिओ,कोपर्निकस,जॉन हस,मार्टिन ल्युथर,स्पिनोझा,न्यूटन.ई**).आज आधुनिक चर्चला माफी मागून चालणार नाही तर,चर्च आणि धर्मसत्ता यांचा संबंध तोडून चर्चला देवाचे राज्य म्हणून पूर्णतः जाहीर करण्याचे धाडस करावे लागेल.आज भरपूर अनात्मवादी ख्रिस्ती उठलेले जे ख्रिस्ती प्रतिनिधीत्व राजकारणात पाठविण्यासाठी संस्था निर्माण करिता आहेत,पण लक्षात ठेवा त्याच्याने देवाच्या राज्याला तडा जातो.आणि असे राजकीय ख्रिस्ती प्रतिनिधी मध्ययुगातील आत्मिक लोकांचे पवित्र रक्त वेदीपुढे सांडण्याचे कार्य करून माफी मागण्याचे ढोंग करितात.म्हणून आजच्या पुढाऱ्यांनी आणि चर्चने न्याय देवाकडे सोपविण्याचे धाडस करावे,अन्यथा आपणच भरपूर ख्रिस्ती लोकांचा बळी घेत आहोत हे आपल्यानाच समजणार नाही_ मध्ययुगातील घडलेल्या या घटना ख्रिस्ती समाजासाठी सुधारणा आणि पवित्रशास्त्राचे योग्य ज्ञान देवो हीच प्रार्थना...

आमरण सुवार्तिक रेव्ह.एच.जी.हावर्ड यांचे संक्षिप्त चरित्र:-

"देवाने नेमलेला सुवार्तिक,एक सुवार्तिक कोण असतो? "ज्याने स्वतःचा पूर्णतः परित्याग करून आपले सर्वस्व ख्रिस्ताला वाहिलेले असते.ज्याने स्वतःचा देश, वंश,प्रदेश आणि राष्ट्रवाद त्यागून दुसऱ्या परकीय प्रांतात जाऊन आपल्या जीवनाचे सर्वस्व कण वेचून द्यावे,याचे उत्तम उदाहरण म्हणजे महाराष्ट्रात आलेले हेन्री जॉर्ज हावर्ड."रेव्ह हावर्ड आपल्या Treasured Memories या आठवणी ग्रंथात म्हणतात_ *"माझ्या आयुष्यात अनेकदा दुःख आणि निराशा पदरात पडली हे खरे आहे.पण त्याजबरोबर सुख

आणि समाधान प्राप्त झाले हेही विसरता कामा नये.या सर्व बऱ्यावाईट अनुभवातून आयुष्य कंठीत असता परमेश्वराने आपल्या कृपेचा गौरवी मुकुट माझ्या मस्तकी ठेवला असेच मला म्हणावेसे वाटते.अशा रीतीने मी माझ्या गत आयुष्याकडे नजर टाकतो,तेव्हा स्वर्गीय पित्याने माझ्यावर केलेल्या प्रेमाच्या अनुग्रहामुळे मी कृतज्ञेच्या भावनेने भारावून जातो."* (पान. न-120)एक सुवार्तिक आपले जीवन देवाच्या कृपेने व्यतीत करून आपले जीवित कार्य पूर्ण करतो.आणि त्यासाठी प्रेम ही प्रथम अट आहे,रेव्ह हावर्ड यांचे भारतावरील प्रेम त्यांना सर्वोच शिखरावर नेऊन ठेवते.म्हणून रेव्ह हावर्ड म्हणतात, *सुवार्तेचे गौरवी मुकुट भारत देशाच्या माध्यमातून देवाने माझ्यावर ठेवले आणि तेच माझे कर्तव्य आणि प्रेम आहे.*

रेव्ह हावर्ड ची वैशिष्ट्य:-

१) ग्रीक भाषेत प्राबल्य.

२)उत्तम ख्रिस्ती पुस्तके विकत घेऊन वाचत.

३)ज्या प्रदेशात सुवार्ता द्यावी तेथील भाषा अवगत केली:-मराठी भाषेवर प्रभुत्व मिळवून साहित्य लिखाण केले.

४)सकाळी पहाटेपासून सुवार्ता प्रचाराची सवय,जीवनाचा अंतिम काळापर्यंत.

५)शिस्त प्रिय जीवन:-आणि मंडळीत ती त्यांनी उत्तम प्रकारे लावून दिली.मराठी भाषेबद्दल आपले प्रेम व्यक्त करताना ते लिहितात *"मराठी भाषा मला अत्यंत प्रिय आहे.मी मोठया आवडीने ती वाचतो,मी मराठीतून विचार करतो,प्रार्थना करतो व मला मराठीतून स्वप्नेदेखील पडतात."* (पान. न-१४)रेव्ह हावर्ड बद्दल लोकांची साक्षी म्हणजे *"जे कोणी चांगले मिशनरी होऊन गेले त्यापैकी रेव्ह हावर्ड हे एक होते"(पान. न-१५) २२ नोव्हेंबर १९६७ ला रेव्ह हावर्ड ख्रिस्तात विलीन झाले डॉ वेल्डमन यांनी मिरज येथील दफनभूमीत तुतारीवर "मुकुट चढवा,कोकऱ्याच्या शिरी" हे गीत वाजविले...मिशनरी चळवळीत महत्वपूर्ण भूमिका विशद करणाऱ्या हेन्री जॉर्ज हावर्ड यांना त्याचा कार्याबद्दल सलाम.

एका वाक्यात ख्रिस्ती धर्म म्हणजे काय

"एका फ्रेंच माणसाने हेगेलला एकदा विचारले "तुमचे तत्वज्ञान एका वाक्यात सांगा" *एका ख्रिश्चन साधूला ख्रिश्चन धर्म एका वाक्यात सांगा असे कोणी विचारले तेव्हा तो म्हणाला "स्वतःप्रमाणे दुसऱ्यावर प्रेम करा".* परंतु हेगेलने दहा प्रचंड खंड लिहून उत्तर दिले.आणि जेव्हा हे दहा खंड लिहिले गेले व प्रसिद्ध झाले आणि सारे जग त्या दहा भागाविषयी बोलत होते,तेव्हा हेगेल मोठया दुःखाने म्हणाला " *एकाच मनुष्याला माझे म्हणणे समजले आणि त्यालाही नीट समजते की नाही,देव जाणे."**तात्पर्य:-*काही लोक सोप्या गोष्टी कठीण करून सांगतात आणि काही कठीण गोष्टी साध्या करून....ख्रिस्ती

मिशनऱ्यांनी ख्रिस्ताचा संदेश सोप्या आणि सरळ भाषेत समजावून सांगितला.पण काही लोक हेगेल प्रमाणे चित्तशक्तीचा स्वरूपात आपले तत्वज्ञान मांडतात,ज्यामुळे ते कोणालाही समजत नाही.

स्वतंत्र भारताचे अस्वतंत्र नागरिक

"धर्मप्रधान,धर्मसहिष्णू आणि धर्मसमन्वयी समजल्या जाणाऱ्या या देशामध्ये,धर्मस्वातंत्र्यच संकटात सापडलेले आहे.एखाद्याच्या धर्म किंवा विश्वास काय असावा हे ठरवण्याचा व निवडण्याचा अधिकार आणि स्वातंत्र्य त्या व्यक्तीचे आहे.धर्मस्वातंत्र्य हा प्रत्येक नागरिकाचा संविधानात्मक हक्क तर आहेच,परंतु त्याशिवाय तो प्रत्येकाचा मानवी हक्क आहे.त्या मूलभूत हक्काची पायमल्ली होणाऱ्या या देशाला व या देशाच्या नागरिकांना स्वतंत्र म्हणता येईल काय?त्यांना स्वतंत्र भारताचे अस्वतंत्र नागरिक म्हटलेलेच अधिक योग्य ठरेल. (**रेव्ह.सुभाष डोंगरदिवे**)स्वतंत्रता हा घटक एका व्यक्तीचे आणि समाजाचे चित्रण प्रकट करीत असतो,पण;स्वातंत्र्याचे मूल्ये जपून;गहाण ठेवून नाही.

"ख्रिस्ती समाजात एक नवीन उत्साह आजकाल दिसून येत आहे,जेवढा उत्साह स्वर्गाच्या राज्यात जाऊन ख्रिस्ताचा हातून मुकुट स्वीकारणे यात नाही,तेवढा उत्साह काही लोकांना राजकारणाचा रिंगणात उतरून पदाच्या प्राप्तीत होतांना आतापासून दिसून येत आहे."

शहरातील ख्रिस्ती लोकांसाठी सुवार्ता:-

"एक *मिशनरी* जे नरभक्षक लोकांत सेवा करीत होते,ते एकदा सुट्टीवरून परत आल्यावर एका *गृहस्थांनी* त्यांना विचारले "मी असे ऐकले की तुम्ही ह्या नरभक्षक लोकांच्यात काम करीत असतांना खूप जीव घेणे प्रसंग व संकटे यांचा अनुभव आला" हो ते तर खरेच आहे" *मिशनरी* उत्तरले त्या *गृहस्थाने* पुन्हा प्रश्न केला "हे लोक नरभक्षक आहेत,हे तर तीथे जाण्यापुर्वीच मला ठाऊक होते" पुन्हा त्याने प्रश्न केला "तुम्हाला तेव्हा मरण्याची भिती नाही वाटली?" *मिशनरीने उत्तर दिले "मी तेथे जाण्यापुर्वीच मेलो होतो" अशा प्रकारची जाणीव असणे म्हणजेच "त्याच्या दुःखाच्या भागीपणाचा" अनुभव असणे,म्हणजेच त्याच्या मरणाशी एकरूप होणे.*पौल* लिहितो *"मी कसे तरी मृतांचे पुनरुत्थान मिळवावे"* _मी कसे तरी_ ह्या शब्दातून पुनरुज्जीवन जगण्याची तो कितीतरी अपेक्षा करत आहे, *मग तो ह्या मृत देहांत असो किंवा प्रभू बरोबर असो ही त्याची हौस आहे.ही शहरातील ख्रिस्ती लोकांसाठी असलेली सुवार्ता आहे, *विचारणा करणारा गृहस्थ शहरातील एक सन्मानात्मक ख्रिस्ती आहे,तर मिशनरी नरभक्षकांमध्ये देवाचे कार्य करणारा आणि ख्रिस्ताची सुवार्ता देण्यात अनेक जखमांनी भरलेला दास आहे.* मिशनरी कोण?आणि त्याची कृत्ये कोणती असावी?याची उत्तरे शोधण्यात आज शास्त्रशाळा कमी पडत आहे.पण एक खऱ्या मिशनरीकडे त्याचे उत्तर आहे.

शत्रूच्या विरुद्ध उभे ठाकून

पूर्ण पेहेरावानीशी जवळ जाऊन

कपटी राक्षसी सैन्य विरोधात

ह्या सर्व दृष्टतेच्या काळांत

येशूने तुम्हासाठी प्राण देऊन त्याच्या प्रीतीला कोण टक्कर देऊ शकेल?

भावठेवा, आपली ढाल राहा धरून

मग कोण तुम्हाला त्याच्या हातून

काढून घेऊ शकेल? (**चार्ल्स वेस्ली**)

भिक्षा मागणारा व्यक्ती आणि मानवतावाद:-

> ''राष्ट्रभक्तीला धर्माच्या पातळीवर आणून बसविणे व धर्माला राष्ट्रभक्तीत परिवर्तित करणे ह्या दोन्ही गोष्टी मी एक ख्रिस्ती म्हणून नामंजूर करतो.ईश्वराकडे कोणत्याही राजकीय चळवळीचे नेतृत्व सोपविण्यास मी एक ख्रिस्ती कसा तयार होऊ शकतो?.''

चित्राच्या माध्यमातून ख्रिस्ताच्या संदेश सेंट मार्टिन आणि बेगर १५९७-९९:* -सेंट मार्टिन हा घोड्यावर बसलेला आहे आणि एक भिकारी भिक्षा मागत आहे.भिक्षा मागणारी व्यक्ती माणूस नसून ती दैवी व्यक्ती ख्रिस्त आहे,म्हणून ती व्यक्ती शरीराने घोड्यापेक्षा उंच दाखविली आहे...सेंट मार्टिन भिकाऱ्यास हिरव्या रंगाचे कापड अंग झाकण्यासाठी देत आहे.जणू काही त्या हिरव्या रंगाने त्याला जीवन देण्याचा प्रयत्न मार्टिन करीत आहे,असे ग्रेकोला सुचवावयाचे असावे.रंगाचा वापर भावदर्शनासाठी आहे. *चित्रकार:-एल.ग्रेको* _ही परीक्षा फक्त ख्रिस्ती लोकांसाठी आहे,कारण प्रत्येक माणूस देवाने स्वतःच्या स्वरूपात तयार केलेला आहे,म्हणून ख्रिस्ती लोक दिन-दुबळ्या लोकांसोबत कसे वागतात याचे किंवा कसे वागावे यांचे सुंदर दर्शन या चित्रात दिलेले आहे.मध्ययुगातील ख्रिस्ताची देण्यासाठी वापरण्यात आलेली ही सुवार्तापद्धत आजही ख्रिस्ती लोक वापरू शकतात पण?आता लोकांची मानसिकता ऐकून घेण्याची राहिलेली नाही तर भावदर्शनातुन ख्रिस्ताची सुवार्ता काय समजून घेतील..

प्रेम काय आहे आणि काय नाही:-

प्रेमाचे सूत्र: -प्रेमातील ९/१० कारण प्रेम करणाऱ्यात *प्रेमीकात* असते,१/१० कारण प्रेमविषयात असते.पुन्हा व्यक्तिविरहीत व विचारविहिन प्रवाहात प्रेम आत्म्याला विसर्जित करीत असते."

१) "विज्ञान म्हणजे क्षुद्र वस्तू आहे,प्रेमाशिवाय काही सत्य नाही"(लप्लास*)

खरे पाहता विज्ञान आपल्या कार्यात जिवंत आणि वस्तुनिष्ठ आहे,पण एक *वैज्ञानिक देखील प्रेमाशिवाय राहू शकत नाही त्याच्यासाठी प्रेम सर्वोत्तम आहे.म्हणून लप्लास आपल्या प्रेमाच्या अंधत्वात विज्ञानाला कनिष्ठ दर्जा देतो.

२) _"प्रेम म्हणजे मानवजातीने व्यक्तीवर लादलेली फसवणूक होय"_(*शोपेनहॉवर*) शोपेनहावर म्हणतात *प्रेम हा शब्द फसव्या मायाजाला प्रमाणे आहे,त्याचे म्हणणे बरोबर आणि खरे आहे,आज भरपूर लोक धर्म,दया,मदतीच्या नावाने फसवणूक करतात* आणि त्यांचे सर्व्यात मोठे हत्यार प्रेम असते,पण काही स्त्री-पुरुष यांनां बळी पडल्यावर याचे ज्ञान प्राप्त होते.

३) _"आपले प्रेम जर अंध व सुस्त नसेल तर हे प्रेम आस्तिक नाही"_ (*जॉर्ज संतायन*) *प्रेमाला आत्मिकतेचा बुरखा आज भरपूर लोकांनी देऊन ठेवला आहे,संतायन म्हणतो तुम्ही तेव्हाच आस्तिक आहात जेव्हा तुम्ही प्रेमात अंध आणि गुंग आहे.ही व्याख्या न पचणारी आहे.पण काही लोक या अंधत्वात आपले जीवन उध्वस्त करून बसतात.* जगिक लालसा आणि आकर्षण यामुळे आपल्या आत्म्याच्या नाश ओढवून बसतात.

४) _"देव प्रेम आहे"_ (पवित्रशास्त्र)

*ख्रिस्ती धर्मात देवाला प्रेम म्हटलेले आहे,येशू ख्रिस्ताने संपूर्ण मानवजातीच्या पापक्षलनासाठी आपल्या प्राणाची आहुती दिली,ख्रिस्त खऱ्या प्रेमाचा आणि मोक्षाचा प्रतीक आहे.पण ख्रिस्ती धर्मात देखील पाखंडी आणि विरोधी तत्वांची बैठक मांडणारे शिक्षक आहे.जे प्रेमाच्या दुरुपयोग करून स्वतःला देवाचा दूत मानतात.आज प्रेमाच्या नावावर होणाऱ्या फसवणुकीस कारणीभूत स्वतः स्त्री-पुरुषांच्या जगिक आणि भौतिक आकर्षणाची लालसा आहे.जे प्रेमाच्या नावावर पापात गुंग असतात आणि अंतिमतः आपल्यासाठी नाश घेऊ चालतात.आपले प्रेम मूल्यवान आहे पापापासून दूर राहून त्या प्रेमाला सत्यासाठी आणि पवित्रतेसाठी खर्च करा.

खरे संजीवन कोठून तरी सुरू व्हायला हवे

तुमच्या कोणाचीही त्यात चूक नाही,एकाचीच ती चूक आहे._

ही अडचण-हा दोष तुमच्या भावाचा नाही

_हा दोष तुमच्या बहिणीचा नाही.

हा दोष व्यासपीठाचा नाही._

हा दोष मंडळीतील सभासदांचा नाही.

प्रिय बंधू,हा दोष.

प्रिय भगिनी,हा दोष.

हा दोष,हा दोष तुझा-तुमचा आहे.

(**माल्कम वेबर**)

संदर्भग्रंथसूची:

१) **बंडखोर आत्मे.खलिल जिब्रान.अनु श्रीपाद जोशी.कॉन्टीनेन्टल प्रकाशन,प्रथमावृत्ती,२००९.पुणे**

२) पश्चिम भारतात ख्रिस्ताचा प्रकाश-बी.सी. भोसले.इम्मनुएल प्रकाशन, प्रथमावृत्ती.२००५. दौड. पुणे

३) सुवार्तीकांच्या पाऊलखुणा.आचार्य सना.सूर्यवंशी.दि एव्हेन्जीलीकल अलायन्स मिनिस्ट्रीज, प्रथमावृत्ती.. १९९९. नाशिक

४) पाश्चात्य कला इतिहास भाग-१.प्रा जयप्रकाश जगताप,प्रथमावृत्ती, २०१०. जगताप पब्लिकेशन्स हाउस, पुणे

५) प्रभूच्या चिरसहवासातील आनंद,माल्कम वेबर,प्रतिमा पब्लिकेशन्स.प्रथमावृत्ती,२०१०

६) मानवजातीची कथा:-डॉ हेन्री थॉमस,वरदा प्रकाशन,प्रथमावृत्ती, २०११. पुणे